॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२८९ दिनांक १३/१२/२०२४

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय:– दिनांक १४ डिसेंबर २०२४ हा दिवस "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" आणि दिनांक १४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत उर्जा संवर्धन सप्ताह म्हणून साजरा करणे बाबत.**

**संदर्भ:–** 1) व्यवस्थापक , महाराष्ट्र ऊर्जा विकास अभियान, यांचे दिनांक १९/११/२०१२
2) मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे जा.क्र. २०२४/टे–१२/जपुती/सीआर– दि१३/१२/२०२४

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ च्या पत्राच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांनी संदर्भ क्र. २ अन्वये दिनांक १४ डिसेंबर हा दिवस **"राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" आणि दिनांक १४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ ऊर्जा संवर्धन सप्ताह** म्हणून साजरा करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयात दिनांक १४ डिसेंबर हा दिवस **"राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" आणि दिनांक १४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ ऊर्जा संवर्धन सप्ताह** म्हणून सोबतच्या पत्रात निर्देशित केलेल्या सुचनांचे पालन करून साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल फोटो, व्हिडीओ, शासनास त्वरीत पाठवावयाचा असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर दिनांक ०७ जानेवारी २०२५ पर्यंत न चुकता पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती

## महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(महाराष्ट्र शासनाची संस्था)

ईसीएन/२०१२-१३/सीआर-२५ दि.१९/११/२०१२

विषय: "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" आणि "ऊर्जा संवर्धन सप्ताह" साजरा करणेबाबत...

संदर्भ: १. विद्युत मंत्री, भारत सरकार यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांस उद्देशून लिहिलेले अर्धशासकिय पत्र क्रमांक डीओ-०८/३/२००९/६९/४२२१–५०-बीआयपी, दिनांक २८ ऑगस्ट, २००९.

२. सचिव विद्युत मंत्रालय, भारत सरकार यांचे मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना उद्देशून लिहिलेले अर्धशासकीय पत्र क्र. ८/३/२००९/६९ दि. १/१/२००९.

३. ब्युरो ऑफ एनर्जी एफीशीयन्सी (बी.ई.ई), केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे पत्र

महोदय/ महोदया,

आजच्या युगात आपण "ऊर्जेशिवाय माणूस" हा विचारसुध्दा करु शकत नाही. सामान्यतः अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभत गरजा म्हणून ओळखल्या जातात, परंतु आजच्या या विकासाच्या युगात "ऊर्जा" याही मूलभूत गरजांत समावेश करावा लागेल. आज ऊर्जेची गरज नैसर्गिक इंधनाचे साठे जसे, कोळसा, खनिज तेल, वायु यावरच भागविली जाते. नैसर्गिक इंधनाचे साठे मर्यादित असून कोळसा ११४ वर्षे, खनिज तेल २० वर्षे तर वायु ३६ वर्षे पुरेल एवढेच शिल्लक आहेत. दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर वापर होत असलेली विद्युत ऊर्जेची निर्मिती देखील कोळशापासून केली जाते. ऊर्जेच्या अव्याहतपणे होत असलेल्या वापरामुळे ऊर्जेचा तुटवडाही भासत आहेच. यामुळे "ग्लोबल वार्मिंग" सारख्या गंभीर समस्यांना जगास सामोरे जावे लागत आहे. ऊर्जा समस्येस सामोरे जाण्यासाठी ऊर्जेचा काटकसरीने व कार्यक्षमतेने वापर होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी ऊर्जा संवर्धनाविषयी सर्व घटकांमध्ये जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे.

दरवर्षी दि.१४ डिसेंबर हा "राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन" तर १४ ते २० डिसेंबर हा "ऊर्जा संवर्धन सप्ताह" म्हणून ओळखला जातो. जनसमुदाय आणि विविध आर्थिक क्षेत्रांमध्ये ऊर्जा बचतीचे महत्व प्रसारीत करणे हा या मागचा प्रमुख उद्देश आहे. विविध क्षेत्रांमध्ये ऊर्जा संवर्धनाचा वाव आणि ऊर्जा कार्यक्षमतेचे महत्व पाहता केंद्र शासनाने ऊर्जा संवर्धन कायदा-२००१ पारित केला आहे. या कायद्याच्या माध्यमातून ऊर्जा वापर कमी होण्यासाठी विविध योजना तयार करण्याच्या अनेक तरतूदी आहेत. या कायद्याचा आणखी एक प्रमुख भाग म्हणजे प्रचार आणि प्रसार माध्यमाचा प्रभावी वापर करून ऊर्जा संवर्धनाचे महत्व विविध घटकांना पटवून देणे आहे.

तरी ऊर्जा संवर्धनाचे उद्दिष्ट साध्य होण्याच्या हेतुने आपल्या स्तरावर ऊर्जा संवर्धन सप्ताह व्यापक प्रमाणात साजरा करण्यात यावा ही विनंती. जेणेकरुन ऊर्जा बचतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास हातभार लावता येईल. महाऊर्जातर्फे सदर आठवडा साजरा करणेसाठी ऊर्जा संवर्धन आठवड्याचे फलक, ऊर्जा बचत विषयाशी निगडीत माहिती पत्रके आणि ऊर्जा संवर्धनावर आधारित पोस्टर्स आपणांस मोफत पाठवित आहोत. सदर फलक आपल्या कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रदर्शित करणेत यावा व आपल्या कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व शाळा, शासकीय कार्यालयांना सदर सप्ताह साजरा करणेसाठी माहितीपत्रक पाठविण्यात यावे, ही विनंती. तसेच आपणांमार्फत साजरा करण्यात आलेल्या ऊर्जा संवर्धन सप्ताहाचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास दिनांक १० जानेवारी, २०१३ पर्यंत पाठविण्यात यावा, जेणेकरुन राज्यशासन व केंद्र शासन यांना सदर आठवडा साजरा केल्याच्या कार्यक्रमांचा अहवाल या कार्यालयाद्वारा पाठविणे शक्य होईल. आवश्यक त्या अधिक माहितीसाठी कृपया महाऊर्जा कार्यालयास संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासु,

व्यवस्थापक (ऊर्जा संवर्धन)

स.नं. १९१, फेज-१, म्हाडा वाणिज्य संकुल, दुसरा मजला, हिंदकमल समोर, येरवडा, पुणे ४११ ००६. दूरध्वनी : ०२०-२६६१४३९३ / २६६१४२८१
फॅक्स : ०२०-२६६१५०३१, E-mail meda@mahaurja.com Web-site http://www.mahaurja.com

(३)

## परिशिष्ठ क्र. १

| अ क्र | कार्यक्रम |
|---|---|
| १. | विविध प्रसिध्दी माध्यमातून जनजागृतीस्तव जाहिराती देणे |
| २. | शालेय स्तरावर उर्जा संवर्धन विषयांतर्गत निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करणे |
| ३. | उर्जा संवर्धन कायद्यांतर्गत उद्योगक्षेत्रातील पदनिर्देशीत ग्राहकांकडून सदर आठवडा साजरा करावयास सांगणे व त्याविषयीचा अहवाल मागविणे |
| ४. | शासनाचे सर्व शासकीय व निमशासकीय विभाग, सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालये, सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व कार्यालये यांना याविषयी कळवून सदर आठवडा साजरा करावयास सांगणे. तसेच त्यांच्या माहितीस्तव व त्यांना मदत होण्याच्या दृष्टीने सदर आठवड्यात कोणकोणते उपक्रम राबवावयाचे याविषयीची मार्गदर्शनपर संक्षिप्त माहिती व जाहिरात फलक पुरविणे व आठवडा साजरा केल्याबद्दलचा अहवाल मागविणे. |
| ५. | उद्योग क्षेत्रातील १००० किलोवॅट विद्युतभार जोडणी असणाऱ्या संस्थांना ऊर्जा संवर्धन आठवडा साजरा करावयास सांगणे व त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ६. | ऊर्जा कार्यक्षम उपकरणांच्या उत्पादकांना ऊर्जा संवर्धन आठवडा साजरा करणेस सांगणे व त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ७. | उद्योग क्षेत्रातील विविध संघटनांना ऊर्जा संवर्धन आठवड्यादरम्यान जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणेसाठी विनंती पत्र पाठवून त्याबाबतचा अहवाल मागविणे |
| ८. | सदर आठवड्यादरम्यान विविध क्षेत्रांसाठी जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे. |
| ९. | ऊर्जा संवर्धनाविषयीचे बॅनर्स व पोस्टर्स तसेच ऊर्जा संवर्धनाची प्रतिज्ञा (मराठी व इंग्रजी) www.mahaurja.com या संकेत स्थळावर आपल्या माहितीसाठी उपलब्ध करून दिली आहेत. |